निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९९ वा.
सोमवार - २२ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# नव्या जीएसटी सुधारणांतून भारताच्या आर्थिक विकासाला नवी गती – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई / देशात २२ सप्टेंबर पासून दुसऱ्या टप्प्याच्या वस्तू व सेवा कर सुधारणा लागू होत असून, या सुधारणा भारताच्या आर्थिक विकासाला नवी गती देणाऱ्या आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

प्रसिद्ध गीतकार, शायर मनोज मुंतशीर यांची संकल्पना असलेल्या 'मेरा देश पहिले- द अनटोल्ड स्टोरी ऑफ श्री. नरेंद्र मोदी' या संगीतमय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

वांद्रे-कुर्ला संकुलातील नीता अंबानी सांस्कृतिक केंद्रात झालेल्या या कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, माजी मंत्री विनोद तावडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, देशाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या रूपाने एक असा नेता लाभला आहे, ज्यांनी नवभारताची निर्मिती केली. आज भारत जागतिक स्तरा-वर सन्मानाने उभा आहे, आणि त्याचे संपूर्ण श्रेय प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या दूरदृष्टीला जाते.

मागील ११ वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी भारताच्या अर्थव्यवस्थेला, विकासाला नवीन दिशा दिली आहे. गरिबी हटवण्यासाठी निर्णायक लढा दिला आहे. आता भारत जगात सर्व मंचावर पूर्ण सन्मानाने व ताकदीने उभा आहे, असे त्यांनी सांगितले.

श्री. फडणवीस म्हणाले की, २२ सप्टेंबर पासून सुरु होणाऱ्या सेकंड जनरेशन जीएसटी सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला नवी गती तर मिळणार आहे. शिवाय सर्व सामान्यांना फायदा होईलच, त्याबरोबरच आपला देश आत्मनिर्भर भारताच्या दिशेने अग्रेसर होईल.

प्रधानमंत्री मोदीजींच्या व्यक्तिमत्त्वाच्या 'अनटोल्ड स्टोरी' विषयी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, एक नवा भारत, एक शक्तिशाली भारत, एक लीडर भारत, मोदीजींनी तयार केला आहे, तो करत असताना मोदीजींच्या जीवनाचे अनेक पैलू हे आपल्यासमोर आले आहेत. परंतू प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्व कसे तयार झाले? कोणत्या कठीण परिस्थितीतून ते गेले? देशासाठी समर्पित असलेलं त्यांचे जीवन टप्प्याटप्प्याने कसे घडले, हे अप्रकाशित पैलू या कार्यक्रमात पाहायला मिळणार आहे.

या सर्व गोष्टी प्रेरणादायी आहेत, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

प्रसिद्ध गीतकार, शायर मनोज मुंतशीर यांन 'मेरा देश पहिले- द अनटोल्ड स्टोरी ऑफ श्री. नरेंद्र मोदी' या संगीतमय कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या बालपणापासून त्यांच्या राजकीय प्रवासापर्यंत, आव्हानात्मक काळ, नेतृत्त्वाची भूमिका, तसेच आयुष्याच्या अशा पैलूंचे सादरीकरण केले.





# हुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्दना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३८ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. जयंतीदिनी कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज यांच्या वतीने नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांचा ५५ व्या वाढदिवसा निमित्त सत्कार संपन्न



**आत्ताच णक्सप्रेस**

**केज/प्रतिनिधी** / महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज च्या वतीने केजच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांचा ५५ वा वाढदिवस दि.२० सप्टेंबर २०२५ वार शनिवार रोजी शासकीय विश्रामगृह केज येथे सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या बाबत सविस्तर वृत्त असे की,राष्ट्रवादीकाँग्रेस पार्टीच्या(अजित पवार गट) धडाडीच्या कार्यकर्त्या केज शहराच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या, कार्यशील नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड यांचा वाढदिवस शाल,श्रीफळ हार,पुष्पगुच्छ देऊन त्यांना भावी वाटचाली साठी शुभेच्छा देण्यात आल्या.वाढदिवसा निमित्त गाण्यांची मैफिल रंगली बार बार दिन ये आये या गाण्याने सर्वांना मंत्रमुग्ध केले. गायकांनी प्रेक्षकांची मने जिंकली.अनेक वक्त्यांनी शुभेच्छा पर भाषण केले व शुभेच्छा दिल्या.डॉ.सौ. सिताताई बनसोड अनेक वर्षा पासून समाजकारण व राजकारण सतत अग्रेसर आहेत.

जनतेची कामे करण्यात सतत उत्साही असतात लोकां विषयी आपुलकी घेऊन त्या सातत्याने काम करीत आहेत.केज शहरातील कोणत्याही अडचणीतल्या व्यक्तीला मदत करण्याची त्यांची भूमिका असते. चढउतार आले तरी शहरांमध्ये आपले असणारे योगदान देऊन पुढे चालण्याचा त्यांचा प्रयत्न चालूच असतो. केज शहर व शहराच्या विकासासाठीआवश्यक असणाऱ्या गोष्टीसाठी त्या आग्रही राहतात. केज शहरात विकासाचे काम चालू असताना सुद्धा सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत.५५ वर्षे पूर्ण झाले तरी कामाचा तोच उत्साह आहे.केज शहरासाठी असेच योगदान त्यांनी पुढच्या काळातही द्यावे अशा प्रकारची सदिच्छा मिळावी व चांगल्या कामाची प्रशंसा व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजच्या वतीने शुभेच्छा देण्यातआल्या.

त्यांचे आयुष्य सुख समृद्धीचे जावे.त्यांना दीर्घायुष्य लाभावे त्यांच्या कडून या परिसरातीलसर्वसामान्य जनतेची व शहराची सेवा घडावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड,सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदकिशोर मिसाळ,प्रसिद्धी प्रमुख पांडुरंग कसबे,डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष विश्वास राऊत,पत्रकार अनिल वैरागे,पत्रकार दत्ता मुजमुले आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीजचोरी करणाऱ्या ३५ जणांवर गुन्हा दाखल

## मीटरमध्ये फेरफार करणाऱ्यांविरोधात महावितरणची मोहीम

**आत्ताच णक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ मीटरमध्ये फेरफार करून बेकायदेशीरपणे वीज वापरणाऱ्या शहर व परिसरातील ३५ जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या २ जणांचा समावेश आहे. महावितरणच्या धडक कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.

महावितरणच्या तपासणी मोहिमेत नारेगावातील ३२ ग्राहक मीटरमध्ये फेरफार करून अनधिकृतपणे वीज वापरत असल्याचे आढळले. रवी किसन चव्हाण, कचरू गंगाधर वाघ, अन्सारी इजाजशहरुल हसीम मिया, ताहेर भिक्कन पटेल, शांतादेवी हरिश्चंद्र मौर्या, सायरा बेगम शेख अहेमद, महेबूब खान सरदार खान, शोभा अशोक निकम, शेख हकीम शेख वाहेद, अब्दुल माजीदजहूर अहेमद, दीपक भाऊराव लोखंडे, शेख हकीम शेख अब्दुल, हकीमाबी रशीद पठाण, झाकेराबी शेख आरेफ, शेख रौफ शेख दौड, कुसुम महेंद्र चौधरी, माजीद अब्दुल गणी अब्दुल, सय्यद बशीर सय्यद वजीर, गणी गफ्फुर कुरेशी, तारेक अब्दुल रौफ अंबारी, सय्यद बिसमिल्लाबी सय्यद सरवार, इस्माइलखा इब्राहिमखा पठाण, किशोर किसन रसोदा, विलास प्रल्हाद चव्हाण, शोभा बद्रीनाथ चव्हाण, बाबूलाल मोहनसिंग बिजारणे, जिंजर संजय रामचंद्र, हिरचंद रतनसिंग माचरेकर, त्रिंबक युवराज जावळे, प्रमिला रामकृष्ण, स्वप्निल किसन निम्कर्डे व पठाण जुनेद खान साबेर खान हे वीजचोरी करताना आढळले. त्यांनी महावितरणचे ६ लाख ४९ हजार ९६० रुपयांचे आर्थिक नुकसान केले. वीजचोरीची बिले व ६४ हजार रुपयांचे तडजोड शुल्क भरण्यास त्यांनी टाळाटाळ केली. जयभवानीनगर येथील अंजनाबाई विलास डेंगळे हिने १५ हजार ९४१ रुपयांची वीजचोरी केली. वीजचोरीचे बिल व २ हजार रुपयांचे तडजोड शुल्क भरण्यास ग्राहकाने टाळाटाळ केली. विमानतळ शाखेचे सहायक अभियंता प्रदीप मिसाळ यांच्या फिर्यादीवरून सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कुंभेफळमध्ये दोन वीजग्राहक अत्याधुनिक स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करताना आढळून आले. संतोष रामदास घुसिंगे याने ९ हजार ८२७ रुपयांचे वीजचोरीचे बिल व ६ हजार रुपयांचे तडजोड शुल्क भरले नाही. जयश्री अनिल त्रीगोटे हिने १६ हजार ६४७ रुपयांचे वीजचोरीचे बिल व ४ हजार रुपयांचे तडजोड शुल्क भरले नाही.

शेंद्रा एमआयडीसी शाखेचे सहायक अभियंता संभाजी अथरगण यांच्या फिर्यादीवरून चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वीजचोरी हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून या गुन्ह्यात तीन वर्षे कारावास किंवा दंड अथवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे.

त्यामुळे कुणीही मीटरमध्ये फेरफार करून वीजबिल कमी करण्याचे आमिष दाखवत असेल तर त्याला बळी न पडता वीजग्राहकांनी त्याची तातडीने महावितरणला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वित्तीय साक्षरता मेळावा तसेच आर केवायसी मेळावा संपन्न




**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर प्रतिनिधी** / महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत व क्रिसील फाउंडेशन यांच्या माध्यमातून देगलूर तालुक्यातील खुतमापूर येथे वित्तीय साक्षरता मेळावा तसेच केवायसी मेळावा घेण्यात आला. बचत गटातील महिला सीआरपी उपस्थित होते. लक्ष्मीताई दत्ता ठाकूर आणि वंदना वाघमारे तसेच गावातील सरपंच बालाजी चोपडे हे उपस्थित होते. आणि सर्व बचत गटातील महिला उपस्थित होते. तरी सर्व महिलांना बँकेविषयी आर केवायसी, प्रधानमंत्री सुरक्षा विमा,जीवन ज्योती विमा, अटल पेन्शन,डिजिटल व्यवहार, तक्रार निवारण प्रणाली,बँक,लोन,शासकीय योजनांची माहिती क्रिसिल फाउंडेशनच्या संगीता ताई वाघमारे यांनी सविस्तर माहिती दिली.

# येरगी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास सुरुवात...

**आत्ताच एकप्रेस**

**देगलूर प्रतिनिधरी**/ देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन ऐतिहासिक नगरी येरगी येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे आणि मराठवाडा मुक्ती दिनाचे औचित्य साधून ग्राम सभा घेऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची सुरुवात करण्यात आली.या अभियानाचे उद्घाटन बालिका पंचायत राज चे सरपंच कु.अंजली वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले.



दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने देगलूर तालुक्यातील चालुक्यकालीन येरगी येथे घेण्यात आलेल्या ग्रामसभेत लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करून ग्राम स्वच्छता,रस्ते दुरुस्ती,पाणंद रस्त्यांना प्राधान्य देणे,ग्राम पंचायत सक्षम करण्यासाठी कर व पाणीपट्टी वसुली करणे, लोकवर्गणीद्वारे जनतेला सुविधा उपलब्ध करून देणे,पंतप्रधान आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे,बचत गट, शेतकरी उत्पादक संस्थेमध्ये महिलांचा सहभाग घेणे, ग्रामपंचायत ,शाळा, अंगणवाडी, पशुवैद्यकीय उपचार केंद्र,आरोग्य उपकेंद्र मध्ये सुविधा उपलब्ध करून देणे,धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे सुशोभीकरण करणे,जल समृद्धी ,स्वच्छ व हरित गाव,वृक्ष लागवड ,प्लास्टिक बंदी आणि घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन करण्यासाठी प्रयत्न करणे या बाबींची चर्चा करण्यात आली.


ग्रामसभेत सर्व उपस्थितांना मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियान विषयी प्रोजेक्टरवर माहिती दाखविण्यात आली, यासच राज्याचे मुख्यमंत्री यांचे लाईव्ह भाषण दाखवण्यात आले. यावेळी सर्वांनी लोकसहभागातून चळवळ उभी करून गावाचा सर्वांगीण विकास साधण्याचा एकमुखाने प्रस्ताव मांडण्यात आला.

ग्रामसभेनंतर गावात रॅली काढण्यात येऊन सदरील अभियानाचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला.यामध्ये विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना याविषयी माहिती दिली.

या ग्रामसभेत संतोष पाटील,सौ.संगीता मठवाले, तलाठी रूषीक`ष म्हेत्रे, कृषी सहायक पांडुरंग मैलारे, तालुका तज्ञ व्यवस्थापक संजय आचमारे, आरोग्य उपकेंद्राचे डॉ.किरण ठाकरे, श्रीमती अनिता असनेवाड,ग्रामपंचायत सदस्य अशोक वाघमारे ,विश्वनाथ बागेवार,मारोती तलारवार,अशोक बरसमवार,कोंडाबाई वाघमारे,सुशिलाबाई सोमावार ,विठाबाई बरसमवार, तंटामुक्ती अध्यक्ष सायलू कांबळे,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष गजानन भोकसखेडे,मुख्याध्यापक अशोक देवकत्ते,बालिका पंचायत चे महादेवी कुंचगे,मोनिका पाटील,रुक्मिणी भुरळे बचत गटाचे मैनाबाई वाघमारे,संतोष काब्दे,रुपाली जाधव,ग्राम पंचायत कर्मचारी माधव इज्जरवार,प्रभाकर वाघमारे,मल्लिकार्जुन मठपती,आदी उपस्थित होते.

# सूर्याचे प्रकाशस्तंभ कसे असतात?

आदित्य, सुभाष व त्यांचे मित्रमंडळ रोजच्यासारखे शाळेच्या मधल्या सुट्टीत निंबाच्या झाडाच्या गार छायेत आपले डबे खात असताना रोजच्यासारखी त्यांची सूर्याज्ञानाबद्दल चर्चा सुरू झाली. दादा, तुम्ही सूर्याच्या प्रकाशस्तंभाबद्दल काही ऐकले आहे का? सुभाषने विचारले. नाही. सगळे एकसाथ म्हणाले. सुभाष सांगू लागला, तुम्ही जर बारकाईने निरीक्षण केल्यास नुकताच उगवत असणाऱ्या किंवा मावळतीच्या अंतिम स्थितीत असणाऱ्या सूर्याच्या डोक्यावर सूर्याच्या रंगाचेच प्रकाशाचे उभे पट्टे दिसतात, त्यांना प्रकाशस्तंभ म्हणतात. ते कधीकधी तिरपेही असतात किंवा पिसाऱ्यासारखेही दिसतात. तसेच ते सूर्याच्या खालच्या बाजूला सुद्धा असतात पण वरच्या प्रकाशस्तभांपेक्षा थोडेसे लहान व अरुंद असतात. पण सूर्याभोवती ते प्रकाशस्तंभ कशामुळे निर्माण होतात? आदित्यनेच विचारले. सुभाष म्हणाला, ढगांमध्ये बर्फाच्या बारीक बारीक चकत्या किंवा तबकड्या क्षितीज समांतर अक्षाभोवती सतत फिरत असतात. त्यांवरून प्रकाशकिरणांचे परावर्तन होते नि सूर्याभोवती प्रकाशस्तंभ निर्माण होतात. मित्रा, सूर्याचा विनाश कसा व केव्हा होईल? हा प्रश्न पिंटूने विचारला. सूर्यामध्ये सदैव हायड्रोजन व हेलियम या त्याच्या दोन्ही घटकांमध्ये रासायनिक प्रक्रिया होत असते. या प्रक्रियेमध्ये हायड्रोजनचे सतत हेलियममध्ये रूपांतर होत असते. या रासायनिक प्रक्रियेतूनच सूर्यावर उष्णतारूपी अतिशय शक्तिशाली ऊर्जाशक्ती उत्पन्न होत असते. हीच ऊर्जाशक्ती सूर्यमालेतील सर्व ग्रह व त्या ग्रहांच्या साऱ्या उपग्रहांना मिळत असते. सूर्यावर सतत घडणाऱ्या या रासायनिक प्रक्रियांमुळे सूर्यावरील हायड्रोजनही हळूहळू कमीकमी होत आहे. शेवटी एक वेळ अशी येईल की सूर्यामधील हायड्रोजन पूर्णपणे संपून जाईल व सूर्याचा नाश होईल. त्याचवेळी त्याच्या केंद्राभोवती असलेल्या भागात अणुप्रक्रिया सुरू होऊन त्याच्या आजूबाजूच्या भागात भयंकर प्रमाणात ऊर्जा निर्माण होईल. त्या ऊर्जेच्या उष्णतेने तो खूप मोठ्या प्रमाणात प्रसरण पावेल व त्याचा एक महाकाय आकाराचा भयंकर तांबडा राक्षसी तारा बनेल. त्याचाही आकार प्रचंड वाढत जाऊन तो शंभर पट मोठा होईल. त्याची उष्णता महाभयंकर वाढेल नि त्या प्रचंड तापमानाने सूर्याच्या सर्व ग्रह-उपग्रहांचा व आपल्या पृथ्वीचासुद्धा शेवट होईल. अर्थात सूर्याच्या या विनाशाला अजून पुढील अब्जावधी वर्षे लागतील. त्यामुळे आपणास भीती बाळगण्याचे वा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. सुभाषने सांगितले. सूर्याची नावे व त्यांचा अर्थ तुला माहीत आहे काय? असा प्रश्न चिंटूने विचारला. ते काही मला माहीत नाही. सुभाष उत्तरला.



मला माहीत आहेत ती नावे. आदित्य म्हणाला व त्याने सांगण्यास सुरुवात केली. ती नावे मित्र, रवि, सूर्य, भानू, खग, पूषण, हिरण्यगर्भ, मरीच, आदित्य, सविता, अर्क व भास्कर ही आहेत. मग या नावांचे अर्थ तुला माहीत आहे का दादा? सुभाषने विचारणा केली. हो. मित्र म्हणजे जगन्मित्र अर्थात संपूर्ण जगाला खऱ्या मित्रासारखे सदैव सहाय्य करणारा, मरणापासून रक्षण करणारा व जीवन देणारा असा सर्व जगाचा मित्र. रवि हा सर्वांनी स्तवन केलेला असा शब्दांचा प्रवर्तक आहे व स्फूर्ती देणारा आहे. सूर्य म्हणजे प्रेरक व संचालक अर्थात तोच सर्वांना प्रेरणा देतो व त्याच्यामुळेच हे जग चालत आहे. तो नसला तर काहीच होणार नाही. भानू शब्दाचा अर्थ ओज व तेज देणारा असा होतो. तोच प्रकाश देतो. आकाशात संचार करणारा म्हणजे खग की जो सर्व इंद्रियांना शक्ती देतो. पूषण म्हणजे वृद्धी करणारा, पोषण करणारा असा अर्थ होतो. हिरण्यगर्भ म्हणजे ज्याच्या गाभ्यात हिऱ्यासारखे तेज आहे असा वीर्यबलदायक. मरीच म्हणजे रोगराई व पापांचा नाश करणारा. आदित्य म्हणजे सर्वांना स्वातंत्र्य व सुख देणारा. सविता म्हणजे सर्वकाही उत्पन्न करणारा असा उत्पादक. अर्क शब्दाचा अर्थ सर्वांना पूजनीय असणारा, मनामध्ये पूज्यभाव निर्माण करणारा. भास्कर म्हणजे प्रकाशक, कांतीदायक अर्थात सर्व जगाला प्रकाशमान करणारा व सजीवांना कांती देणारा. आदित्यने सूर्याच्या बाराही नावांचे अर्थ सांगितले. दिनकर, प्रभाकर अशीही सूर्याचीच नावे आहेत ना दादा. सुभाषने विचारले. आपल्या वेदांनुसार सूर्याला एकशेआठ नावे आहेत. प्रत्येक नावाचा एक विशिष्ट असा अर्थ आहे. दिनकर म्हणजे जो आकाशात दिवसभर प्रवास करतो तो आणि प्रभाकर म्हणजे जो आपल्या प्रभेच्या करांनी अर्थात प्रकाशकिरणांनी सकाळी नभ उजळवून टाकतो तो. आदित्यने सांगितले. तो असे सांगत असतांनाच मधली सुट्टी संपल्याची शाळेची घंटा झाली.

## बकेश्वर पत्रकारांवरील हल्ल्याचा जाहीर निषेध दोषींवर कठोर कारवाई करावी; शेतकरी कृती समितीची ग्रहमंत्र्याकडे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा/** दि २१ सप्टेंबर रोजी शेतकरी कृती समितीच्या वतीने राहुल ढोले पाटील, इंजी.महेशभाई गुजर, आण्णासाहेब जाधव, यांनी ईमेल द्वारे मुख्यमंत्री तथा ग्रहमंत्री देवेंद्र फडणवीस, यांना त्र्यंबकेश्वर येथे वार्तांकनासाठी गेलेल्या झी २४ तासचे ब्युरो चीफ योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे, आणि पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ किरण ताजने, या तिघा पत्रकारांवर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर काम करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांनी दगड, लाथा-बुक्के व शिवीगाळ करत भीषण हल्ला केला.या हल्ल्यात किरण ताजने, गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अपोलो रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पत्रकारांवर वारंवार होणारे असे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी व चौथ्या स्तंभावर घाला घालणारी निंदनीय कृत्ये आहेत. पत्रकार समाजासाठी, सत्यासाठी आणि लोकशाहीच्या बळकटीसाठी अहोरात्र काम करतात. अशा पत्रकारांवर गुंड प्रवृत्तीने केलेले हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत.

शेतकरी कृती समिती च्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला जात असून, प्रशासनाने संबंधित गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर तातडीने कठोरात कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे.

आता तरी सरकार व प्रशासनाने पत्रकार सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत, अन्यथा पत्रकार संघटना तीव्र आंदोलन छेडण्यास बाध्य होतील, असा इशारा देखील या निवेदनात देण्यात आला आहे.

## लासुर स्टेशनचे माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल जाधव यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हाउपाध्यक्षपदी निवड...

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी /फिरोज मन्सुरी** / गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील रुबाबदार व्यक्तिमत्व असलेले राजकारणा पेक्षा समाजकारणाची आवड असलेल्या लासुर स्टेशन चे भूमिपुत्र अनिल लक्ष्मणराव जाधव यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाउपाध्यक्ष पदी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशाने निवड करण्यात आली आहे या नियुक्तीचे पत्र दमदार आमदार सतीश चव्हाण तथा जिल्हाअध्यक्ष यांनी अनिल जाधव यांना नियुक्तीचे पत्र दिले दरम्यान आपल्या सारख्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या जोरावर आजही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांशी देखील आपली नाळ जोडली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार व पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहचवून जिल्हयातील पक्ष संघटन प्रभावी व मजबुत करण्यासाठी आपले मोलाचे सहकार्य राहील असा आहेत मला विश्वास आहे.



आपल्या पुढील कार्यास माझ्या शुभेच्छा व तसेच मित्र मंडळ यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या संतोष खाजेकर प्रभू बागुल बागुल फारुख शेख बाळासाहेब थोरात प्रदीप चव्हाण जय जयदेव जाधव गणेश मढीकर अनिल शिंगारे राजू दिवेकरसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांनी शुभेच्छा दिल्या....

## गाजगाव येथील भागीनाथ हिवाळे हा युवक नांगरे बाभूळगाव शिवारात विहीरीत पडल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू...

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी** / गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथून जवळ असलेल्या नांगरे बाभूळगाव शिवारात गाजगाव येथील युवक भागिनाथ मदन हिवाळे हे विहिरीत पडल्यामुळे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्यांना लासुर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दाखल केले असता त्यांना वैद्यकीय अधिकारी यांनी मयत घोषित केले दरम्यान

शिल्लेगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली आहे हि दुर्दैवी घटना, दि, २०, सप्टेंबर रोजी घडली आहे अकस्मात मृत्यू नं.५५ /२०२५ कलम -१९४ भा. न्याय.संहीता



मयताचे नाव -भागिनाथ मदन हिवाळे वय २९ वर्ष राहणार गाजगाव ता गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर पुढील तपास शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे..

## पैठण येथील रंगारहाट्टी येथील नवरात्र उत्सवाची कार्यकारणी जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी** / दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या जुन्या पैठण मधील रंगारहाट्टी गल्लीत साला बाद प्रमाणे श्री कालिका देवी नवरात्र उत्सव परंपरेनुसार साजरा करण्यासाठी महिला मंडळाची समिती स्थापन करण्यात अली आहे.



यंदाच्या या मंडळाच्या अध्यक्षपदी-प्रिया जोशी उपाध्यक्षपदी-योगिता वरकड यांची निवड करण्यात आली. तर सचिव-कविता गोजरे सहसचिव-मोनिका रावस, वैशाली खिस्ती कोषाध्यक्ष-पुनम जैस्वाल सहकोषाध्यक्ष-रोहिणी चौधरी, स्वाती साळुंके,कल्याणी घुले स्पर्धा अध्यक्ष-भारती जव्हेरी उपाध्यक्ष- मनीषा धापसे दांडिया समिती-पायल ठोंबरे,पूजा असोलकर, पूजा सराफ, अश्विनी लोंधे,रूपाली चौधरी,कल्पना परागे,रंजीता दायमा स्वागत समिती -अश्विनी ठोंबरे,प्रीती कुलकर्णी,सुवर्णा सारडा,मैथिली घुले,शितल चपडे,श्रद्धा रावस,कल्पना बिचुकले आरती समिती - राणी गोजरे, पुजा तोरकडे, ऋतुजा खीस्ती छायाचित्र प्रसिद्धी समिती-सीमा मुळे, गीता नेमाने ,स्वाती भारदे, संगीता अखेगावकर, निकिता सराफ, सुवर्णा घुले,कोमल वैद्य यांची निवड करण्यात आली आहे.

नवरात्र उत्सव दि. २२ सप्टेंबर सोमवार पासुन सुरू होत असुन दि.२ ऑक्टोबर गुरुवारी दसराच्या शुभ पर्वावर या सोहळ्याचे सांगता होणार आहे. नवरात्र उत्सवात सामाजिक प्रबोधनाचे व विविध स्पर्धांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील २३ हजार ग्राहक प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत करताहेत वीजनिर्मिती घरांच्या छतावर उभारले ८१.८ मेगावॅटचे सौरऊर्जा प्रकल्प

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेत महावितरण महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील २३ हजारांहून अधिक ग्राहक विजेबाबत स्वावलंबी झाले आहेत. त्यांच्या घराच्या छतावर सौर पॅनेलच्या माध्यमातून ८१.८ मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे. ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान असलेल्या या योजनेत वीजहकांना वीजबिल जवळपास शून्य करणे शक्य असल्याने जास्तीत जास्त ग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी केले आहे. दरमाह तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी केंद्र सरकारने फेब्रुवारी-२०२४ मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केलेली आहे. घराच्या छतावर १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांना दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिट वीज मोफत मिळविण्याची संधी या योजनेत मिळत आहे. त्यामुळे या योजनेस छत्रपती संभाजीनगर परिमंडलात वीजग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

घरगुती वीज ग्राहकांना छतावर सौर ऊर्जानिर्मिती संच बसवता यावा यासाठी विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे तसेच कर्जाची प्रक्रियाही सुलभ करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यास ग्रामीण ग्राहकांना प्रोत्साहन देणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन निधीही देण्यात येणार आहे. याबरोबरच महावितरणकडून १० किलोवॅटपर्यंतच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे तसेच सौर नेटमीटरदेखील उपलब्ध करून देण्यात येत आहे.

योजनेत कार्यान्वित झालेल्या सौर प्रकल्पांतून निर्माण झालेली वीज ग्राहकांना वापरता येते. शिवाय ग्राहकाची गरज भागवून वीज शिल्लक राहिल्यास महावितरणकडून ती विकत घेण्यात येत आहे. त्याची रक्कम संबंधित ग्राहकांच्या वीजबिलात समायोजित केली जात आहे. छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे. याबरोबरच गृहनिर्माण संस्था, घरसंकुलांसाठी विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन व सामायिक उपयोगासाठी ५०० किलोवॅटपर्यंत प्रति किलोवॅट १८ हजार रुपये असे कमाल ९० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. ३०० युनिटपर्यंत मासिक वीजवापर असणाऱ्या घरगुती वीजग्राहकांसाठी ही योजना अतिशय उपयुक्त आहे. तसेच सुमारे २५ वर्षे या सौर प्रकल्पांतून घरातील वीजवापरासाठी मोफत वीज उपलब्ध होणार आहे.

पीएम-सूर्यघर योजनेच्या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर प्रकल्प बसवण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो. प्रकल्प बसविल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. वीज ग्राहकांना https://www.pmsuryaghar.gov.in या संकेत स्थळावर योजनेची सर्व माहिती उपलब्ध आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील २३ हजार १०५ ग्राहकांनी सूर्यघर योजनेचा लाभ घेतला आहे. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १८ हजार ८११ ग्राहकांनी ६६.३८ मेगावॅट तर जालना जिल्ह्यातील ४ हजार २९४ ग्राहकांनी १५.४२ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच घराच्या छतावर बसवून वीज निर्मिती सुरू केली आहे.

पीएम-सूर्यघर योजनेत सौर ऊर्जा संच बसवणाऱ्या ग्राहकांना जवळपास मोफत वीज मिळत आहे. शासनाकडून अनुदान मिळणाऱ्या या योजनेचा घरगुती ग्राहक व निवासी संकुलांनी लाभ घ्यावा. महावितरणकडून यासंबंधीच्या सर्व प्रकिया ऑनलाईन व सुलभ करण्यात आली आहे.

## सोयगाव रा.प. महामंडळाचे कॅन्टिन उपहारगृह बनले हप्ते जमा करण्याचा अड्डा... प्रवासी युवतीसह , माध्यमिकच्या विद्यार्थिनी - महिलांची होतेयं कुचंबणा...

**आत्ताच एक्सप्रेस /**
**सोयगाव / प्रतिनिधी** / सोयगाव शहरात मध्यावर्ती ठिकाणी राज्य परिवहन महामंडळ छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत सोयगाव बस आगाराच्या अधिनास्थ बस थांबा असुन त्यात प्रवाश्यांच्या सोईसाठी एक कॅन्टींग उपहारगृह व्यवस्था असुन शहरभरात चांगलाच दरारा निर्माण केला आहे.विषेश बाब अशी की, या कॅन्टीन मध्ये ग्राहकांऐवजी आंबट शौकीन व दोन नंबर व्यवसाईकांची मोठी गर्दी असते. तेथेच तासनतास थांबुन समोर बसलेल्या युवती, विद्यार्थीणिंना - माय मावल्यांना अशील - लज्जास्पद हावभाव

**कॅन्टीन धारकाचे कथित वाईट प्रवृत्तीशी संबंध असून, हे ठिकाण आर्थिक देवाणघेवाणीच्या संदिग्ध व्यवहारांसाठी वापरण्यात येत असल्याचा संशय नागरिकांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.**






आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या कॅन्टीन मध्ये आजतागायत प्रवाश्यांना नास्ता भजे, समोसा, कचोरी , पाणी, चहा - कोल्ड्रिंक्सचा आस्वाद मिळालेला नाही. कॅन्टीन चालक गृहरक्षक दल व एका पथसंस्थेचा उपाध्यक्ष असल्याने राजकीय शक्ती व पोलीसांची भक्तीच्या जोरावर उपहारगृहाचे वाटोळे करित पोलिसांची तडजोडी चा मध्यस्थ दलालाचे काम करुन वाईट ईशारे करित असतात परिनामी महिला वर्ग कांहीं एक वस्तूची खरेदी करण्यासाठी धज्जावत नाही.

रा.प.महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी या बाबी कडे अनदेखी करित असल्याने महिला प्रवाश्यांची सुरक्षा प्रश्न निर्माण झाला आहे.

**कॅन्टीन / उपहारगृह फक्त केवळ टाइमपासचे ठिकाण ?**

गेल्या अनेक वर्षांपासून हे कॅन्टीन एका ठराविक व्यक्तीकडेच आहे. नियमानुसार प्रवाशांना मिळणाऱ्या आवश्यक सेवा पूर्णपणे बंद आहेत. चहाच्या कपाऐवजी येथे चर्चेचे अड्डे रंगलेले असतात. टवाळखोर मंडळी येथे तासन् तास बसलेली असतात, त्यामुळे महाविद्यालयीन तरुणी आणि महिला प्रवाशांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**आगार प्रमुखांचा निष्क्रियपणा!**

प्रवाशांच्या हितासाठी उपाययोजना करणे हे आगार प्रमुखांचे कर्तव्य असताना, त्यांनी अक्षरशः

झोपेचे सोंग घेतले आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असतानाही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

**भाडेतत्त्वावर देण्याची मागणी तीव्र**

या पार्श्वभूमीवर, कॅन्टीनची व्यवस्थापन पद्धत बदलण्याची प्रवाशांकडून जोरदार मागणी होत आहे. छत्रपती संभाजीनगर परिवहन विभागाने यात तातडीने लक्ष घालून, हे कॅन्टीन भाडेतत्त्वावर देण्याची पारदर्शक प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे, हे कॅन्टीन एक होतकरू दिव्यांग व्यक्तीस उदरनिर्वाहासाठी देण्यात यावे, जेणेकरून त्याच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळेल, अशी भावना अनेक प्रवाशांनी व्यक्त केली.

## नादरपुर ग्रामपंचायती मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ किनगाव (ता. फुलंब्री) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. या पार्श्वभूमीवर नादरपूर ग्रामपंचायतीत कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. त्यानंतर ग्रामसभा घेऊन अभियानाची उत्साहात सुरुवात करण्यात आली.

अशोक सिरसे, प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) वासुदेव सोळुंके अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायचंद्र घोरपडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे उपकार्यकारी अधिकारी पंचायत

विभाग तसेच डॉ. ओमप्रकाश रमावत गट विकास अधिकारी पंचायत समिती कन्नड यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीत कार्यवाही



ग्रामसभेत अभियानात सक्रीय सहभागासाठी ठराव पारित करण्यात आला. यानुसार दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामस्थांनी प्रत्येकी ५०० रुपये प्रमाणे मिळून तब्बल १७ हजार रुपये जमा केले. एकूण ३४ ग्रामस्थांनी दिलेल्या या योगदानातून ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अधोरेखित झाला.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, राबविण्यात आली.सरपंच सविता दिलीप निकम म्हणाल्या की, ग्रामस्थांचे सहकार्य आणि प्रशासनाचे मार्गदर्शन यामुळे अभियानाला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

यापुढील उपक्रम अधिक जोमाने राबविले या वेळी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

### मोतीगव्हाण मध्ये १ कोटी १० लाखांचे विकास कामाच्या लोकार्पण सह सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत रक्तदान, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

# विकास हीच आमची प्राथमिकता, सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीसी – रावसाहेब पाटील दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** भाजपा जालना महानगर ग्रामीण मंडळाच्या वतीने सेवा पंधरवाडा अभियानांतर्गत मौजे मोती-गव्हाण ता. जालना येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महा रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण तसेच एकूण रु. १ कोटी १० लाखांच्या विकासकामांचे लोकार्पण माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ.कैलासजी गोरंटयाल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, सतीश जाधव, नगरसेवक शशिकांत घुगे,मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे आदींची उपस्थिती होती. हा कार्यक्रम दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू होऊन रात्री ५ पर्यंत मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग दिसून आला. रक्तदान शिबिराला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तर आरोग्य तपासणी शिबिरामध्ये अनेक रुग्णांनी तपासणी करून घेतली. स्वच्छता अभियानामुळे गावात स्वच्छतेबाबत जागृती झाली तसेच वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळाली.

यावेळी विकासकामांच्या लोकार्पणाचा समारंभही पार पडला. गावातील रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, शैक्षणिक सुविधा आदी कामांसाठी मंजूर झालेल्या १ कोटी १० लाखांच्या निधीतून झालेल्या विकास कामांचे लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री मा.रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भाजपाच्या माध्यमातून विकास हीच आमची प्राथमिकता आहे. जालना जिल्ह्यातील प्रत्येक भागात पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासह सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा निर्धार आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचवणे हीच खरी सेवा आहे. सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत आज जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत आणि त्यातून नागरिकांचे जीवनमान उंचावेल. जनतेच्या विश्वासाला आम्ही पात्र ठरू याची खात्री आहे. यावेळी मोतीगव्हाण येथील नागरिकांनी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आनंद व्यक्त केला.



या कार्यक्रमाला धनराज काबलिये, सुरेश लोळगे, सुधाकर खरात, परसराम तळेकर, डॉ. तुकाराम कळकुंबे, शिवा दादा शेजुळ, अनिल सरकटे, गजानन खरात, दत्ता घुले, काकासाहेब घुले, राजाभाऊ कळकुंबे, राजाराम जाधव, कैलास उबाळे, बद्रीनाथ भसांडे, ज्ञानेश्वर राठोड, रामजी शेजूळ, प्रतिक पोहेकर, दौलत भुतेकर, नारायण जाधव, निवृत्ती लंके, सतीश केळकर, सुनील पवार, वसंत शिंदे, हरिभाऊ गोरे, कपिल भुरेवाल, कृष्णा गायके, गोपाळ मोरे, मुकेश चव्हाण, नामदेव ढाकणे यांच्यासह ग्रामीण मंडळातील कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या अभियानाचे उत्कृष्ट आयोजन मोतीगव्हाण चे सरपंच श्री. विजय मोहिते व सखाराम मोहिते, सावळीराम मोहिते, अर्जुन मोहिते, महादेव मोहिते, नारायण मोहिते त्यांच्या मित्रपरिवाराने केले.त्यांच्या या पुढाकारामुळे गावात सामाजिक बांधिलकी जपत उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## संक्षिप्त

# केज तालुक्यात ओबीसी आरक्षणाचा बळी.. अशोक भंडारे या तरुणाने केली आत्महत्या

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज प्रतिनिधी/** केज तालुक्यात सारणी सांगावी ) या गावच्या नाभिक तरुणाने ओबीसी आरक्षण जाते कि काय या धास्तीने आत्महत्या केली. सध्याचे वातावरण ओबीसी आरक्षणा साठी अगदी ढवळून निघले आहे, मराठा समाजाची मागणी सरकारने आम्हाला ओबीसी मधून आरक्षण द्यावे अशी आहे तर ओबीसी समाज आरक्षण टिकवण्यासाठी, आरक्षण बचाव आंदोलने, मोर्चे काढत असून प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वा खाली ओबीसी समाज एकवटला आहे. त्यातच केज तालुक्यातील सारणी (सांगवी ) या गावच्या अशोक भंडारे या नाभिक समाजातील तरुणाने आपले आरक्षण जाते की काय ? या नैराश्या पोटी,भितीपोटी शेतातील बाभळीच्या झाडाला फाशी घेऊन आत्महत्या केली त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, पत्नी आणि दोन मुले असा परिवार असून या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून घरातील कर्ता पुरुष गेल्याने संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले असून याची दखल घेऊन शासनाने या कुटुंबास तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी नाभिक समाज बांधवातून होत आहे.



# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करा - महादेव घुले

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज प्रतिनिधी/** बीड जिल्ह्यात नव्हे महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना न्याय द्यावा. सतत गेल्यात आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे या



पावसाने शेतकरी अडचणी सापडला आहे. पावसाने शेतात आजही पाणी साचून शेतातील पीक पूर्णपणे कुजत आहे. नदीकाठावरील शेती तर पूर्णपणे खरडून गेली आहेत. शेतकर्यांच्या तोंडचा घास निघून गेला आहे, शेतकर्यांनी जगावं कसं, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे केज तालुकाध्यक्ष महादेव घुले यांनी केली आहे.

जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून परतीच्या पावसाने हजेरी लागली आहे. या झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शेतकर्यांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.यामुळे शेती नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होत आहे.बीड जिल्हयात अनेक ठिकाणी सोयाबीन, कांदा, बाजरी , कपासी इतर तरकारी पिकांमध्ये पाणी साठल्याने ही पिके पाण्यात बुडालेली आहेत. त्यामुळे शेतकर्यांना लाखोंचा फटका बसला आहे. मुसळधार पावसामुळे भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यात अधिक भर म्हणजे बाजारपेठेमध्ये दर कोसळल्याने शेतकर्यांना पावसाचा व दरांचा असा दुहेरी फटका बसत आहे.

सोयाबीन पिकामध्ये पाणी साठल्याने सोयाबीन खराब होऊन कीड लागून खराब झाली आहे. परतीच्या पावसाने खरीप हंगामावर मोठे संकट ओढवले असून शेतकरी अक्षरशः उघड्यावर आले आहेत. दरम्यान प्रशासनाने या नुकसानीचा पंचनामा करून शेतकर्यांना तात्काळ दिलासा द्यावा अशी मागणी मनसे शेतकरी सेनेचे केज तालुकाध्यक्ष महादेव घुले यांनी केली आहे.

# प्रगतीची दालने खुली करायची असेल तर व्यवसायाशिवाय पर्याय नाही-राजेंद्र कोंढरे

### मराठा समाजासाठी कर्ज साक्षरतेच्या प्रशिक्षणात विविध विषयावर विचारमंथन-अरविंद देशमुख

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी /** मराठा समाज हा २८ टक्के आहे. कुणबी समाजासह ही संख्या ३५ ते ३७ टक्के होते. जर देशाच्या आर्थिक विकासातून शंभर रुपये निर्माण होत असतील, तर त्यातील ३७ रुपये समाजाच्या खिशात आले पाहिजेत. मात्र, हा बॅकलॉग आजही प्रलंबित आहे. त्यामुळे प्रगतीची दालने खुली करायची असतील तर सर्विस सेंटर व व्यवसायाशिवाय पर्याय नाही, असा सल्ला अखिल भारतीय मराठा महासंघाचे राजेंद्र कोंढरे यांनी दिला.

रांजणगाव (जि. पुणे) येथे अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे रविवार दि. २१ सप्टेंबर रोजी कर्ज घेण्यापूर्वीची, घेतल्यानंतरची व फेडेपर्यंतची साक्षरता या महत्त्वपूर्ण विषयावर श्री. कोंढरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते, उद्घाटन सत्रात ते बोलत होते. याप्रसंगी चार्टर्ड अकाउंटंट डी. एस. बोरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे प्रतिनिधी सचिन खाजे, महासंघाचे संयुक्त सरचिटणीस गुलाब गायकवाड, जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, पुणे जिल्हाध्यक्ष अंकुश लांडे, शिरूर तालुका पदाधिकारी व जिल्हा सरचिटणीस भास्कर पुंडे, तालुकाध्यक्ष शामकांत वर्पे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश शिंदे, युवक अध्यक्ष राहुल शिंदे, महिलाध्यक्ष अर्चना डफळ, जिल्हा उपाध्यक्ष वर्षा काळे, उर्मिला फलके, ज्योती वाळके, मंगेश मोरे, सुरेश पतंगे आदी मान्यवर उपस्थित होते.





यावेळी बोलताना श्री. कोंढरे म्हणाले की, कर्ज व्यवस्थापनाच्या बाबतीत कोणत्याही बँकेची अडचण नसते. मात्र, कर्जाचे योग्य नियोजन आणि वेळेवर परतफेड करण्यासाठी तीन गोष्टी शिकणे गरजेचे आहे. त्या म्हणजे कर्ज घेण्यापूर्वीची साक्षरता, कर्ज घेतल्यानंतरचे व्यवस्थापन, कर्ज फेडेपर्यंतची शिस्तबद्धता आणि कर्जाचे व्यवसायात रूपांतर करून चांगले व्यवस्थापन. आगामी दहा वर्षात सरपंचकी, देशमुखी, पाटीलकी या पारंपरिक संकल्पना कालबाह्य ठरणार आहेत. समाजाने टिकून राहण्यासाठी व पुढे जाण्यासाठी गुणवत्ता, पैसा, सुख-समृद्धी आणि आरोग्य या मूल्यांचा स्वीकार करावा लागेल. मराठा समाजाने जातीवादी चौकट सोडून सर्वसमावेशक दृष्टी स्वीकारली, तरच खरी प्रगती साध्य होईल. समाजातील तरुणाईने उद्योजकतेकडे वळून आत्मनिर्भर होणे हेच काळाचे खरे आव्हान आहे.

या शिबिरात मनोगत व्यक्त करताना जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख म्हणाले की, कर्ज घेण्याबाबत समाजामध्ये अनेक गैरसमज आहेत. योग्य साक्षरता नसल्याने अनेक व्यवसाय थकबाकीत जातात. या प्रशिक्षणातून मिळालेली मार्गदर्शनाची दिशा नक्कीच समाजातील युवकांना उद्योजकतेकडे वळवेल. मराठा समाज आर्थिकदृष्ट्या सबळ व्हावा यासाठी अशा शिबिरांची नितांत गरज आहे, असे ते म्हणाले. उपस्थितांनी अशा सत्रांचे नियमित आयोजन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

# पत्रकारांवरील झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ दोषींवर कठोर कारवाई करा, पत्रकार सेवा संघाचे शिल्लेगाव पोलीस निरीक्षकांना निवेदन...

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी /** गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील पोलीस चौकी येथे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांना निवेदन देण्यात आले दरम्यान त्र्यंबकेश्वर येथे वार्तांकनासाठी गेलेल्या झी २४ तासचे ब्युरो चीफ योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे आणि पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ किरण ताजने या तिघा वरिष्ठ पत्रकारांवर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर काम करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांनी दगड, लाथा-बुक्के व शिवीगाळ करत भीषण हल्ला केला.या हल्ल्यात किरण ताजने गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अपोलो रुग्णालयात तातडीने उपचार सुरू आहेत. पत्रकारांवर वारंवार होणारे असे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी व चौथ्या स्तंभावर घाला घालणारी निंदनीय कृत्ये आहेत. पत्रकार समाजासाठी, सत्यासाठी आणि लोकशाहीच्या बळकटीसाठी अहोरात्र काम करतात. अशा पत्रकारांवर गुंड प्रवृत्तीने केलेले हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. पत्रकार सेवा संघ आणि जिल्हा मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला जात असून, प्रशासनाने संबंधित गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर तातडीने कठोरात कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात सर्व पत्रकारा कडून होत आहे. आता तरी सरकार व प्रशासनाने पत्रकार सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत, अन्यथा पत्रकार संघटना तीव्र आंदोलन छेडण्यास बाध्य होतील, असा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे.. यावेळी पत्रकार मकसूद शेख मधुकर दंडगव्हाळ गुलाब वाघ फिरोज मन्सुरी आप्पासाहेब वंजारे नवल कोठारी अशोक जैस्वाल खलील शहा सलीम सैय्यद सह उपस्थित होते



# प्रॉपर्टी साठी जन्मदाती आईची निर्गुण हत्या! परळी तालुक्यातील भोजनकवाडी येथील घटना

**आत्ताच एक्सप्रेस**
**परळी प्रतिनिधी..../**परळी तालुक्यातील भोजनकवाडी गावात एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जन्म दिलेल्या आईला केवळ घर नावावर करून देत नाही म्हणून तिच्या मुलानेच दगडाने डोक्यात मारून निर्घृण हत्या केल्याची घटना दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता उघडकीस आली. या प्रकरणी पोलीस ठाणे परळी ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, आरोपी चंद्रकांत कांगणे वय अंदाजे २६ वर्ष हा आपल्या आईकडे (मयत सुनंदा ज्ञानोबा कांगणे, वय अंदाजे ५० वर्ष, रा (भोजनकवाडी) सतत घर नावावर करून देण्याची मागणी करत होता. मात्र, मयत हिने घर तिच्या नावेच ठेवले. त्यामुळे आरोपी चंद्रकांत याने रागाच्या भरात दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता आईच्या डोक्यात कुरुंदाचा दगड घालून गंभीर दुखापत केली. जखम गंभीर असल्याने त्यातच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गु.र.नं. ४०५ / २०२५, कलम १०३ (१) इछड नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मुलाला पोलीसांनी अटक केली आहे. अधिक तपास पो.नि. सय्यद हे करीत आहेत. दरम्यान, जन्मदात्री आईसारख्या मायेच्या व्यक्तीची केवळ मालमत्तेच्या वादातून घडलेली हत्या ही समाजातील नैतिक अधःपतनाचे उदाहरण असुन, या घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813